गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक ३१३ वा ● बुधवार ०३ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 313 | Date : 03/04/2024 blow Wednesday, Page 4 Price 4

## राज्यात शुक्रवारपासून चार दिवस पावसाचा अंदाज

पुणे : राज्यावर असलेल्या हवेच्या द्रोणीय स्थितीमुळे आद्रतेचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे शुक्रवार, पाच एप्रिलपासून चार दिवस राज्यभरात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. या काळात तापमानातही दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण तमिळनाडू ते पूर्व विदर्भापर्यंत हवेच्या खालच्या स्तरात एक द्रोणिका रेषा तयार झाली आहे.

ही रेषा कर्नाटक आणि मराठवाड्यावरून जाते. त्यामुळे शुक्रवारपासून हवेत आद्रता वाढून पाच ते आठ एप्रिल दरम्यान मध्य महाराष्ट्रात. सहा ते आठ एप्रिल या काळात कोकण, मराठवाड्यात आणि सात ते आठ एप्रिल दरम्यान विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.हिमालयाच्या पायथ्याचा भाग आणि ईशान्य भारत वगळता राजस्थान, दिल्लीपासून संपूर्ण दक्षिण भारतात कमाल तापमान सरासरी ३८ ते ४० अंश सेल्सिअसवर गेले आहे. पुढील चार-पाच दिवस ही तापमानवाढ कायम राहण्याचा अंदाज आहे. राज्यात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरी ३८ ते ४० अंशाच्या दरम्यान राहील.

मराठवाड्यात रात्रीच्या तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होऊन रात्रीही उकाडा जाणवू शकतो, असेही हवामान विभागाने म्हटले आहे. विदर्भातील ब्रह्मपुरी येथे मंगळवारी ४२.३ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. जळगाव, मालेगाव, सांगली, सोलापूर, औरंगाबाद, नांदेड, बीडसह संपूर्ण विदर्भात पारा ४० अंशांवर होता.

## सोलापुरात एमआयएमचे एन्ट्री ?

पंढरपूर/प्रतिनिधी:सोलापूर लोकसभेसाठी वंचित बहुजन आघाडीने उमेदवार देण्याची घोषणा केली आहे अशातच आता एमआयएम लोकसभेसाठी निवडणुकीच्या रिंगणात उभारण्याचे शक्यता वर्तवली जात आहे मोहोळ चे माजी आमदार रमेश कदम यांची सोलापूर एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतल्यानंतर त्यांच्या उमेदवारीबाबत चर्चा झाल्याचे सांगण्यात आले आहे सोलापूर लोकसभा ही अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ असल्याने कदम निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे कदम हे २०१४ स*** मोहोळ विधानसभेतून आमदार म्हणून निवडून आले होते मात्र लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ प्रकरणात गेले अनेक वर्ष तुरुंगात होते दरम्यान काही महिन्यापूर्वी ते जामीन वर बाहेर आले आहेत सध्या ते आगामी लोकसभेच्या दृष्टीने तयारी करत असल्याची माहिती समोर आली आहे

अशातच आता कदम यांनी एमआयएम च्या नेत्याची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झालेली झाले आहेत यादी वंचित बहुजन आघाडीने सोलापूर मधून राहुल गायकवाड उमेदवारी जाहीर केली आहे एम आय एम ने उमेदवार दिल्यास सोलापूरची रंगत अजून वाढणार आहे हा विकास आघाडीचा उमेदवार व प्रीती शिंदे यांच्या अडचणीत वाढ होणार आहे

# एकनाथ शिंदे मोठ्या निर्णयाच्या तयारीत,

# ६ विद्यमान खासदारांचं तिकीट कापण्याची चिन्हं

मुंबई : महायुतीतील शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारीवरून राज्याच्या राजकारणात आता मोठं महाभारत घडण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या आठ उमेदवारांची पहिली यादी जाहीर तर केली, पण त्यावरून आता वाद होण्याची शक्यता आहे. हिंगोलीचे हेमंत पाटील आणि हातकणंगल्याचे धैर्यशील माने यांची उमेदवारी मागे घेण्यात येणार असल्याच्या बातम्या आहेत. तर भावना गवळी आणि हेमंत गोडसेंना कोणत्याही परिस्थितीत संधी मिळणार नसल्याचं सांगितलं जातंय. शिंदे गटाच्या विद्यमान सहा खासदारांचा पत्ता कट करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी



दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २८ मार्च रोजी त्यांची उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. त्यामधील हेमंत पाटील आणि धैर्यशील माने यांच्या नावाला भाजपचा असलेला विरोध लक्षात घेता त्यांची उमेदवारी मागे घेण्याची नामुष्की ओढावण्याची शक्यता आहे.

जाहीर करण्यात आलेल्या आठपैकी सात खासदारांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. त्यामध्ये रामटेकच्या कृपाल तुमाने यांची उमेदवारी या आधीच कापण्यात आली आहे. तर लोकांच्या असलेल्या नाराजीच्या अहवालाचा संदर्भ देत हिंगोलीतील हेमंत पाटील आणि हातकणंगल्यातील धैर्यशील मानेंच्या । पान २ वर

## सत्ता राखण्यात मोदीजी इतके तल्लीन झाले की, त्यांना; चीनच्या कुरापतीवरून शरद पवार गटाची पंतप्रधानांवर टीका

नवी दिल्ली : चीनने अरुणाचल प्रदेश सीमेवरील जवळपास ३० ठिकाणांची नावे बदलल्याचे वृत्त आहे. यावरून भारत आणि चीनमध्ये शाब्दिक युद्ध सुरू आहे. चीनने अरुणाचल प्रदेशला आपला भाग म्हटले, तर अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचे भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी चीनला ठणकावून सांगितले. तसेच अरुणाचल प्रदेशमधील काही ठिकाणांची नावे बदलल्याने कोणताही परिणाम होणार नसल्याचेही मंत्री एस.जयशंकर



म्हणाले.

भारतात सध्या लोकसभेची निवडणूक जाहीर झालेली आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षाचे नेते, प्रचार, सभा, पक्षाच्या बैठकी, मेळावे, यामध्ये गुंतलेले आहे. या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील विविध ठिकाणी सभा घेणार आहेत. आता यावरूनच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने अधिकृत ट्विटर (एक्स) अकाऊंटवरून एक पोस्ट करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. ट्विटमध्ये म्हटले की, सत्ता राखण्यात मोदीजी इतके तल्लीन झालेत की, त्यांना चीनकडून भारतीय हद्दीत होणाऱ्या कुरापती दिसेनाशा झाल्या आहेत. पंतप्रधान । पान २ वर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर निवडणूक रिंगणात

### अमरावती मतदारसंघातील लढत वेगळ्या वळणावर

अमरावती : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांचे बंधू आणि रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर हे अमरावती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी सज्ज झाले असून मंगळवारी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.



उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आनंदराज आंबेडकर यांनी शक्तिप्रदर्शन केले. त्यांनी याआधी कधीही निवडणूक लढविलेली नाही. ते पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना आनंदराज आंबेडकर म्हणाले, आपण सर्वांच्या विकासासाठी काम करणार आहोत. मतदारांचा प्रचंड उत्साह पाहून आपला विश्वास द्विगुणीत झाला आहे. मतदार आपल्यावर विश्वास ठेवून निवडून देतील, अशी अपेक्षा आहे. अमरावती मतदारसंघाचा सर्वांगिण विकास हाच आपला । पान २ वर

## ऊस तोडणी मजुरांच्या ट्रॅक्टरला ट्रकची धडक; ४ ठार, १० जखमी

सांगली : ऊसतोडीचा हंगाम संपल्यानंतर गावी परतत असलेल्या ऊस तोड कामगारांच्या ट्रॅक्टरला ट्रकने भीषण धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन महिला, एका बालिकेसह चार जण जागीच ठार झाले. रत्नागिरी- नागपूर राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी पहाटे झालेल्या या अपघातात १० जण जखमी झाले असून दोघांची प्रकृती



चिंताजनक आहे. कवठेमहांकाळ तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावरील आगळगाव फाटच्यावर उभा असणाऱ्या रस्त्याकडेला नादुरुस्त झालेल्या ट्रॅक्टरला मालवाहू ट्रकने धडक दिल्याने अपघात घडला.

दत्त कारखाना शिरोळ येथील ऊस तोड संपल्याने मंगळवेढा तालुक्यातील ऊस तोड कामगारांना सोडण्यासाठी ट्रॅक्टर जात होता. कवठेमहांकाळ तालुक्यातील आगळगाव फाट्या नजिक ट्रॅक्टर (केए २८ टीबी ३५६९) आला असता ट्रॅक्टरचा बेल्ट तुटल्यामुळे ट्रॅक्टर रस्त्याच्या कडेला उभा करून दुरुस्तीचे काम सुरू होते. दरम्यान या उभा असणाऱ्या ट्रॅक्टरला पाठीमागून मालवाहू ट्रक (एपी ३९ युएम ५३८८) या वाहनाने जोराची धडक दिली. यामध्ये शालन दतात्रय खांडेकर (वय ३४ रा.सीरनांदगी) लगमा तामराया हेगडे (वय ३५) दादा आप्पा आयवळे (वय १७) व निलाबाई परशुराम आयवळे (वय ३, सर्व रा. चिखलगी ता. मंगळवेढा जि. सोलापूर) हे जागीच ठार झाले.

ट्रॅक्टरमध्ये एकूण २१ ऊस तोड मजूर प्रवास करत होते. त्यामधील १० जखमी झाले असून २ व्यक्तींची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. जखमींना मिरज वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून पालकमंत्री सुरेश खाडे यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली. ऊसतोडीचे काम झाल्यानंतर गावी जात असताना या झालेल्या दुर्दैवी घटनेमुळे चिखलगी गावावर शोककळा पसरली आहे. या घटनेची नोंद करण्याचे काम कवठेमहांकाळ पोलिसांत सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच महामार्ग व कवठेमहांकाळ पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. ट्रॅक्टर मधील ऊस तोड कामगारांचे संसार उपयोगी साहित्य या अपघातानंतर सर्वत्र विखुरले गेले होते.

## उष्माघाताचा त्रास टाळण्यासाठी नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी: जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नवले

### जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे , ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालये येथे उष्माघात कक्ष सुरू

सोलापूर/प्रतिनिधी: सध्या उन्हाळा सुरु असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. वाढत्या तापमानामुळे उन्हात फिरणाऱ्या व्यक्तींला उष्माघात होण्याची शक्यता असल्याने तीव्र उन्हात फिरु नये तसेच नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी केले आहे.



सोलापूर जिल्ह्यामध्ये कडाक्याच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा ४५ अंशा पर्यंत पोहचतो. आताच मार्च अखेर शहरातील तापमान ४२ अंश इतके झाले आहे. त्यामुळे उष्माघाताचा लोकांना त्रास होऊ नये यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालये येथे उष्माघात कक्ष सुरू केले आहेत. प्रत्येक कक्षात लागणाऱ्या प्राथमिक गरजेची पूर्तता करण्यात आली आहे.सध्या शेतीची कामे सुरू असून शेतमजूर आणि शेतकरी उन्हाची पर्वा न करता शेतात राबतात. त्यामुळे त्यांना उष्मघाताचा फटका बसण्याची सर्वाधिक शक्यता असते. अशा रुग्णांना त्वरित उपचार मिळावेत यासाठी आरोग्य विभागाने जिल्ह्यात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालये येथे स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरू केले आहेत.

आरोग्य केंद्रात उष्माघात कक्षात रुग्णांसाठी बेड, कुलर, थंड पाण्याची व्यवस्था, फॅन या सह औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच वाढत्या उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या आजारांसह होणारे दुष्परिणामाबाबत । पान २ वर

## तुम्ही कितीही षडयंत्र रचा, सोलापूरच्या मूळ प्रश्नावरून मी मागे हटणार नाही : प्रणिती शिंदे

पंढरपूर/प्रतिनिधी: भाजपकडून सुशीलकुमार शिंदे यांच्यावर व यांच्या विरोधात खोटे आरोप केले जात आहे पण विकासाच्या मुद्द्यावर न बोलता आमच्यावर कितीही खोटे व नाटे आरोप केले तरी राम सातपुते यांची तुम्हाला फार काळ जनतेचे



प्रश्र्न टाळता येणार नाहीत सोलापूर जिल्ह्यात म्हणून मी तुम्हाला सोलापूरच्या भरभरून प्रश्र्नापासून पळ काढू देणार नाही असे आव्हान महाविकास आघाडीवर उमेदवार प्रणिती शिंदे यांनी सातपुते यांना दिले आहेत. शिंदे म्हणाल्या खोटं बोलताय आणि ते रेटून बोलताय ही भाजपचे जुनेच परंपरा आहे भाजपमध्ये गेल्या दहा वर्षात सोलापूरचा प्रश्र्नावर काहीही काम केले नाही त्यामुळे दरवेळी सोलापूरची निवडणूक आली की भाजपकडून प्रसारमाध्यमांना फक्त शिंदे साहेबांचे खोटी नाते आरोप केले जातात आणि सोलापूरच्या मूळ मूलभूत प्रश्र्न पासून फळ काढता काढला जातो त्याची आणि त्यांच्या उमेदवाराची नेहमीचीच पद्धत असणाऱ्या या नागाची त्यांनी यावेळी राम सातपुते यांच्यावर केला मात्र सोलापूरच्या विकासासाठी मी भाजपला पण विकासाच्या मुद्द्यासाठी त्यांना मी पळ काढू देणार नाही शहरातील अवंती नगर येथे शिक्षक सन्मान आत त्या बोलत होत्या

जुनी पेन्शन योजना असो सोलापूर लोकसभेच्या उमेदवार जुनी पेन्शन योजना त्यांनी पाठिंबा दिला राज्यात आणि देशात आघाडीचे सरकार आल्यावर जुनी पेन्शन लागू करण्यात येईल असे ही त्यावेळी दिले यावेळी दक्षिण सोलापूर विधानसभेचे माजी आमदार दिलीप माने सोलापूर काँग्रेस पक्ष अध्यक्ष चेतन नरोटे उद्योजक श्रीकांत पाटील यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.भाजपमधून होत असलेल्या टीकेला उत्तर देताना प्रणिती शिंदे पुढे म्हणाले की केलेल्या कामाचा शिंदे कुटुंब जमत नाही आणि काँग्रेस कार्यकर्ते पूर्ण वेळ कोल्हापूरच्या सेवेत कायम असते कडून मागील दहा वर्षात सोलापूर मध्ये कोणकोणते विकास कामे झाली यावर चर्चा होताना दिसून येत नाही त्यावरून शिंदे म्हणाले की मी माझ्या आमदारकीच्या पंधरा वर्षाच्या कामात कस कमी केले आहेत जाहीरपणे मी सर्वांसमोर सांगते मी राम सातपुते सारखे मुख्य मुद्द्यावरून न बोलता पळ काढते असे नाही श्री भोसरी ठिकाणी सोलापूरच्या लोकसभेच्या उमेदवार पनीती शिंदे यांनी केली आहे

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### पाण्याची समस्या

पन्नास वर्षांत लहान मोठी हजारो धरणे होऊनसुध्दा पाण्याबाबत आपण सुजलाम् सुफलाम् का नाही यावर विचार व्हावा असे कुणालाही वाटत नाही. लातूरला रेल्वेने पाण्याचे टँकर आणले याचा अभिमानाने उल्लेख होतो. जेव्हा उन्हाळ्यात प्यायला पाणी नसते तेव्हाही मोठ्या व्यासाच्या जलवाहिन्या फुटणे, आगी लागल्याने लाखो लीटर पाणी त्यासाठी खर्च होणे ही त्याच अनागोंदीची पुढील लक्षणे आहेत. स्वच्छतेच्या नावाखाली मंत्र्यांनी पाण्याने रस्ते धुणे हे जबाबदारीचे लक्षण नाही. पुरेसे पाणी उपलब्ध नसताना त्याचा वापर वाढेल अशा सर्व योजना सरकार प्राधान्याने राबवते ते कसे यावर फारशी चर्चा होत नाही. ऊस, साखर याला प्रोत्साहन देणे, सिमेंटचे रस्ते, उड्डाणपूल, वाहन निर्मिती, रिफायनरी हे जिव्हाळ्याचे विषय आहेत. मद्य निर्मिती, शीतपेये, वॉटर पार्क यालाही मुक्त परवाने आहेत. निवडणुकीचे वारे वाहू लागले की मद्य निर्मिती उद्योग दुप्पट वेगाने कामाला लागतो. ऐन उन्हाळ्यात क्रिकेट हंगाम सुरू झाला की लाखो लीटर पाणी मैदानावर उडवणे हे श्रीमंतीचे लक्षण आहे, असेही आपल्याला वाटते. पाण्यातील घसरगुंडीचे गेम खेळणे यात मोठे क्रीडा नैपुण्य आहे असे बालकांना आणि त्यांच्या आधुनिक पालकांनाही वाटते. १४० कोटी नागरिकांना किमान आवश्यक पिण्याचे शुध्द पाणी पुरवणे हे आव्हान आहे. आपले पाणी नियोजन हे उपलब्ध पाण्यावर आहे, ते मुळात चुकीचे आहे. पाण्याची कमतरता नाही. पावसाळ्यात शहरे बुडतील एवढे पाणी प्रचंड नुकसान करून सागराला मिळते. त्यापूर्वी नदीमार्गात भूमिगत टाक्या बांधून ते साठवता येऊ शकते का, यावर संशोधन होऊ शकते. हजारो किलोमीटरचे लांब, रुंद रस्ते बांधताना त्या खाली पाणी साठवणूक होऊ शकेल का यावरही विचार होऊ शकतो. भारतात सगळ्यात मोठी समस्या आहे ती प्राधान्य कशाला द्यायचे हे न समजण्याची. बुलेट ट्रेन, चांद्रयान, पाण्याखालून रस्ते, लोहमार्ग, चारधाम यात्रा संपन्न होण्यासाठी रस्ते इत्यादी होऊ नयेत असे मुळीच नाही. मात्र, त्याआधी पिण्याचे शुध्द, मुबलक पाणी बाराही महिने मिळायला हवे ही किमान अपेक्षा अवाजवी नाही. राज्यातील प्रत्येक भागात पाण्याचे नियोजन नसल्याने सर्वांचेच हाल होत आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला कुणी कमी समजू नका.....

## लोकसभेची निवडणूक विधानसभेसाठी ची रंगीत तालीम; शहापूर, राष्ट्रवादी काँग्रेस च्या मार्गदर्शन शिबिरात नेते मंडळींची विधाने




शहापूर/विजय घनघाव : शहापूर - लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्शवभूमीवर भिवंडी लोकसभेच्या निवडणूक करिता राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे जिल्हा ग्रामीण यांच्या वतीने पदाधिकारी मार्गदर्शन शिबीर शेटे मॅरेज हॉल शहापूर येथे आयोजित करण्यात आले होते ..लोकसभा निवडणूक २०२४ च्या अंतर्गत भिवंडी लोकसभेसाठी महायुती कडून विद्यमान खासदार आणि केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री सन्माननीय कपिल पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.. सदर भिवंडी लोकसभा निवडणुकीत आगामी काळातील प्रचार, आणि पुढील रणनीती आखणी करण्यासाठी महायुतीचे घटक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे जिल्हा ग्रामीण च्या समस्त पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शन बैठक शिबीर आयोजित करण्यात आले होते.. महायुती मध्ये आमचा वाटा सुद्धा तितकाच महत्वाचा आहे आणि निवडणूक जरी लोकसभेची असली तरी ही आगामी विधानसभेची रंगीत तालीम असल्याचे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस च्या वरिष्ठ पदाधिकारी आणि नेते मंडळी कडून करण्यात आली आहेत. पक्षाच्या वरिष्ठांचा जो आदेश असेल त्या नुसार महायुती च्या उमेदवाराला आपण सहकार्य करणार आहोत तर भाजप ने सुद्धा आमच्या राष्ट्रवादी च्या कार्यकर्त्याना मान सन्मान देऊन सहकार्य करावं... असं मत यावेळी मार्गदर्शन शिबिरात व्यक्त करण्यात आले आहे...

या मार्गदर्शन शिबिरात राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, सरचिटणीस किसनराव तारमळे, पक्षाचे प्रसिद्धी प्रमुख आणि मा.खासदार आनंद परांजपे, ठाणे जिल्हा ग्रामीण भारत गोंधळे, महिला जिल्हा अध्यक्ष कल्पना तारमळे, शहापूर चे आमदार दौलत दरोडा, ठाणे जिल्हा युवक चे अध्यक्ष प्रतीक हिंदुराव, शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. मनोहर सासे,महिला अध्यक्ष मोरगे ताई , वाडा तालुका अध्यक्ष जयेश शेलार, मुरबाड अध्यक्ष चंद्रकांत बोस्टे, कल्याण अध्यक्ष बाळाराम कोर, भिवंडी ग्रामीण चे कैलास घरत आदी उपस्थित होते..

कार्यक्रम सूत्रसंचालन राष्ट्रवादी ठाणे ग्रामीण चे प्रवक्ते मुकेश दामोदरे यांनी केले..

# वागदरी येथे श्री संत भवानसिंग महाराज मंदीर यात्रा संपन्न : हजारो भाविक भक्तानी घेतले महाराजांचे दर्शन



वागदरी /एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातिल वारकरी सांप्रदायाचा वारसा जोपासणारे गाव म्हणुन ओळखले जाणा-या वागदरी जिल्हा धाराशिव येथे श्री संत सदगुरू भवानसिंग महाराज मंदिर यात्रा मोठ्या उत्साहात व विविध धार्मीक कार्यक्रमाने संपन्न झाली. श्री सदगुरू संत भवानसिंग महाराज यांच्या मुळेच वागदरी गावाला वारकरी सांप्रदायाचा वारसा लाभलेला असून दर वर्षी श्री संत भवानसिंग महाराज भजनी मंडळ,यात्रा कमिटी व समस्त ग्रामस्थांच्या वतीने ग्राम दैवत श्री सदगुरू संत भवानसिंग महाराज यांची यात्रा भरवली जाते. याही वर्षी दि. ३१ मार्च व १ एप्रिल २०२४ रोजी दोन दिवसिय यात्रा भरविण्यात आली होती.यात्रे निमित्ताने दि.३१ मार्च रोजी अक्कलकोट तालुक्यातील मौजे चुंगी येथुन प्रतिवर्षा प्रमाने सायंकाळी ठिक ६.०० वा.दरम्यान श्री संत भवानसिंग महाराज यांच्या पालकीचे आगमन वागदरी गावात झाले.गावातील मुख्य रस्त्यावरून टाळ मृदंगाच्या गजरात पालकीची मिरवणूक काढण्यात आली.रात्रभर चक्री भजन,प्रवचण,हरी जागर,किर्तन आदी धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तर दि.१ एप्रील रोजी सकाळी १०.३० वा.पासून विविध गावातून आलेल्या टाळकरी दिंडीच्या पाऊलाचे (खेळाचे) सादरीकरण व अभंग गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला.शेवटी दुपारी २.३० वा दरम्यान लाही फोडून यात्रा महोत्सवाची सांगता करण्यात आली.या प्रसंगी वागदरी,नळदुर्ग,शहापूर,गुजनूर,दहीटणा,खुदावाडी, लोहगाव,नंदगाव,होर्टी,मुर्टा,चिकुंद्रा,किलज,सराटी सह परिसरातिल हजारो भाविक भक्तानी घेतले श्री संत भवानसिंग महाराज व श्री संत चोखाबा महाराज यांच्या समाधीचे दर्शन.

पान १ वरुन

### सत्ता राखण्यात मोदीजी इतके

नरेंद्र मोदी यांनी मागील निवडणुकीवेळी ५६ इंचाची छाती असल्याचा नारा देत ही टॅगलाइन वापरली होती. यानंतर ही टॅगलाइन खूप हिट ठरली होती. त्यानंतर यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विरोधकांकडून टीकाही झाली होती. तसेच केंद्रात मोदी सरकार सत्तेत अल्यानंतर देशातील काही शहराचे आणि रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याचा निर्णय घेतला होता. त्यामध्ये अलाहाबादचे प्रयागराज (उत्तर प्रदेश) आणि महाराष्ट्रातील औरंगाबाद, उस्मानाबाद या जिल्ह्यांची नावे बदलण्याच्या प्रस्तावाला केंद्राने मंजूरी दिली होती. यानंतर ही नावे अनुक्रमे 'छत्रपती संभाजीनगर' आणि 'धाराशिव' देण्यात आली.

आता याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत एक खोचक ट्विट केले. ट्विटमध्ये म्हटले, इथे मोदीजींनी ५६ इंचाची छाती म्हणून भारतातील शहराची नावे बदलली. मात्र, तिकडे चीनने अरुणाचलप्रदेश सीमेवरील आतापर्यंत ५६ भागांची नावे बदलली आहेत, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने म्हटले आहे. दरम्यान, चीनकडून अरुणाचलप्रदेश सीमेवरील नावे कोणत्या वर्षात, किती ठिकाणी नावे बदले, याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने सांगितले की, २०२१-१५, २०२३-११, २०२४-३०, अशा मिळून गेल्या चार वर्षात ५६ ठिकाणांची नावे चीनने बदलल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने ट्विटमध्ये केला आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू

ध्यास असेल, असे ते म्हणाले.आनंदराज आंबेडकर यांना वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा दिल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून करण्यात आला असला, तरी वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष नीलेश विश्वकर्मा यांनी मात्र अद्याप अधिकृतरीत्या आनंदराज आंबेडकर यांना पाठिंबा जाहीर करण्यात आलेला नाही, असे सांगितले. पाठिंब्याविषयीचा निर्णय हे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर आणि पक्षाची कार्यकारिणी घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. वंचित बहुजन आघाडीने अमरावती मतदारसंघातून प्राजक्ता पिल्लेवान यांना यापूर्वीच उमेदवारी घोषित केली आहे. आनंदराज आंबेडकर हे गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने अमरावतीचा दौरा करीत आहेत. आपण अमरावतीतून निवडणूक लढवावी, अशी स्थानिक कार्यकर्त्यांची इच्छा होती, असे त्यांचे म्हणणे आहे.

आनंदराज आंबेडकर यांच्या उमेदवारीमुळे मतदारसंघातील लढत ही वेगळ्या वळणावर पोहोचली आहे. अमरावतीतून काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखडे यांनी याआधीच उमेदवारी अर्ज दाखल केला असून उद्या बुधवारी प्रहार जनशक्ती पक्षाचे उमेदवार दिनेश बुब हे तर गुरुवारी ४ एप्रिल रोजी भाजपच्या उमेदवार नवनीत राणा या उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

### उष्माघाताचा त्रास टाळण्यासाठी

जन जागरुतीही करण्यात येत आहे.

उष्माघात होण्याची कारणे : शारीरिक श्रमाची, अंग मेहनतीचे व कष्टाची कामे करणे, कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये काम करणे, काच कारखान्यात काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीमध्ये काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे, अशा प्रत्यक्ष उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संपर्क येण्याने उष्माघात होऊ शकतो.

लक्षणे : मळमळ, उलटी, हात पायात गोळे येणे, थकवा येणे, ४० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त ताप येणे, त्वचा गरम होणे व कोरडी पडणे क्वचित लाल होणे, घाम न येणे, डि-हायड्रेशन, चक्कर येणे, निरुत्साही वाटणे, डोके दुखणे, छातीत धडधड होणे, रक्त दाब वाढणे, मानसिक अस्वस्थ, बेशुद्धवस्था इ.

अति जोखमीच्या व्यक्ती:बालके, लहान मुले, खेळाडू, सतत उन्हात काम करणाऱ्या व्यक्ती, वयस्कर व्यक्ती ज्यांना हृदय रोग, फुप्फुसाचे विकार, मूत्रपिडाचे विकार .

प्रतिबंधात्मक उपाय : वाढत्या तापमानात फार वेळ कष्टाची कामे करणे टाळणे व शक्य नसल्यास थोड्या वेळाने सावलीत विश्रांती घेऊन पुन्हा काम करावे. कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असताना करावीत. उष्णता शोषून घेणारे कपडे (काळ्या किंवा भडक रंगाचे) वापरू नयेत. सैल पांढरे किंवा फिक्कट रंगाचे सूती कपडे वापरावेत. तीव्र उन्हाच्या वेळेस बाहेरजाणे टाळावे. बाहेर प्रवासाला जाताना पाणी सोबत ठेवावे. पाणी भरपूर प्यावे. डि-हायड्रेशन होऊ देऊ नये, लिंबू सरबत, लस्सी, ताक, नारळ पाणी इत्यादी प्यावे. उन्हात बाहेर जाताना गॉगल्स, डोक्यावर टोपी, टॉवेल, फेटा, छत्री इत्यादीचा वापर करावा.घरामध्ये कामाच्या ठिकाणी कुलर्स, एअर कंडिशनर्स, वाळ्याचे पडदे यांचा वापर करावा. पार्क केलेल्या वाहनांमध्ये मुले किंवा पाळीव प्राण्याना सोडू नका. उष्माघाताची लक्षणे आढळल्यास त्वरित नजीकच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधावा.

उपचार : रुग्णास प्रथम सावलीत आणावे,. रुग्णाचे तापमान कमी करण्यासाठी त्वरित उपचार सुरू करावेत,रुग्णाचे कपडे सैल करुन त्वरित अंग थंड पाण्याने शरीराचे तापमान कमी होईपर्यंत पुसत राहावे. रुग्णास हवेशीर व थंड खोलीत ठेवावे, खोलीतील पंखे, कुलर्स, एअर कंडिशनर्स त्वरित चालू करावेत. रुग्ण शुद्धीवर आसल्यास त्यास थंड पाणी, जल संजीवनी द्यावे व डि-हायड्रोशन टाळावे. चहा, कॉफी देवू नये .रुग्णाच्या काखेखाली आइस पॅक ठेवावेत, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याचा पट्टया ठेवाव्यात.थर्मामीटरने रुग्णाचे तापमान बघत राहावे व ३६.८ सेल्सिअस तापमान होई पर्यंत वरील उपचार चालू ठेवावेत. नजीकच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधावा. रुग्णास रुग्णालयात भरतीची गरज पडल्यास १०८ म्बुलन्ससाठी कॉल करावा. असे आवाहनही जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले यांनी केले आहे.

### एकनाथ शिंदे मोठ्या निर्णयाच्या

उमेदवारीला भाजपने विरोध केला आहे.

धैर्यशील माने यांच्या जागेवर त्यांच्या आई निवेदिता माने यांना संधी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. तर दुसरीकडे हेमंत पाटील यांची उमेदवारी मागे घेऊन त्यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना यवतमाळ वाशिममधून उमेदवारी देण्यात येणार असल्याची माहिती समोर येतेय. त्यामुळे यवतमाळच्या विद्यमान खासदार भावना गवळी यांचे तिकीट आपोआप कापण्यात शक्यता आहे. भावना गवळी या यवतमाळमधून पाच वेळा खासदार म्हणून निवडून आल्या आहेत.

शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर एकनाथ शिंदे यांच्यासोबत १३ खासदार आले होते. त्यामधीलच भावना गवळी, हेमंत पाटील, धैर्यशील माने, हेमंत गोडसे या चार जणांच्या उमेदवारीवर टांगती तलवार आहे. तर रामटेकच्या कृपाल तुमाने यांची उमेदवारी या आधीच कापण्यात आली आहे.

वायव्य मुंबईचे खासदार गजानन किर्तीकर यांनी वयाचं कारण देत निवडणूक न लढण्याची भूमिका घेतली आहे. त्यांच्या ठिकाणी अभिनेता गोविंदाला संधी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. वायव्य मुंबईतून ठाकरे गटाकडून गजानन किर्तीकर याचे सुपुत्र अमोल किर्तीकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शिंदेसोबत आलेल्या वरील पाच खासदारांचं तिकीट कापण्यात येणार असल्याची चर्चा आहे. त्यापैकी दोघांची उमेदवारी जाहीर झालेली असतानाही त्यांच्या नावाची चर्चा आहे. तर भावना गवळी, हेमंत गोडसे यांच्या उमेवारीवरून तिढा आहे.

अडचणीच्या काळात ठाकरेंची साथ सोडून आपण तुमच्यासोबत आलो, पण आता उमेदवारीसाठीही झगडावं लागतंय अशी भावना सध्या या खासदारांची आहे. त्यामुळे ज्यांच्या नावावर भाजपकडून फुली मारण्यात आली आहे ते विद्यमान खासदार एकनाथ शिंदेंवर नाराज आहेत.

# संजय राऊतांनी शिवसेना, राष्ट्रवादी संपवली, आता, काँग्रेसमधील नेत्याचं मोठं विधान

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जागा वाटपाची चर्चा सुरू आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत रंगणार आहे. परंतु, अंतर्गत वादांमुळे दोन्ही आघाड्यांमध्ये वाद निर्माण झाले आहेत. महाविकास आघाडीमध्येही मतभेद निर्माण झाल्याची चिन्ह आहेत. त्यातच मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघात अमोल किर्तीकरांना उमेदवारी मिळाल्याने काँग्रेसचे संजय निरुपम संतापले आहेत. हाच संताप त्यांनी आज पुन्हा व्यक्त केला. ते आज माझा कट्ट्यावर बोलत होते.

संजय राऊतांनी शिवसेना संपवली, असं वाटतं का, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर ते म्हणाले, संजय राऊतांनी स्वतःची शिवसेना संपवली, राष्ट्रवादी संपवली आणि आता ते आमची काँग्रेसही संपवत आहेत. ज्याप्रमाणे मुंबईत जोर देऊन सहा पैकी पाच जागा घेण्याचा हट्ट आणि महाराष्ट्रातील ४८ पैकी जास्तीत जास्त जागा घेण्याचा हट्ट त्यांनी केला. त्यांच्याकडे काही नाहीय. त्यांचे नेते पळाले, त्यांचे कार्यकर्ते पळाले. त्यांचे मतदार किती हेही माहीत नाही. तरीही जबरदस्ती करून ते आमच्याकडून जागा घेत आहेत. मी आज भाकित करून जातो की मुंबईमध्ये पाचच्या पाचही जागा शिवसेना गमावणार आहे. मी आव्हान देतो की ते एकही जागा जिंकणार नाहीत. जेव्हा पाच जागा पडणार

तेव्हा शिवसेना संपली आणि काँग्रेसही संपणार. कारण या पाच मतदारसंघातील कार्यकर्ता विखुरणार. वाटाघाटी बरोबरीचं झालं पाहिजे. आमचा प्रस्ताव होता की चीन तीन जागा घ्या. पण पाच जागा तुम्ही घेणार आणि एक आम्हाला देणार. मग आम्ही कार्यकर्त्यांना काय सांगणार? विदर्भात काँग्रेसची ताकद आहे, पण मुंबईत त्यांची ताकद नाही. ठाकरे गटाची सध्या काय ताकद आहे, हे कोणीही काही सांगू शकत नाही, असंही ते म्हणाले.

# राज्यात ओपिनियन आणि एक्झिट पोलला निवडणूक कालावधीत प्रतिबंध

मुंबई/वृत्तसंस्था : भारत निवडणूक आयोगामार्फत लोकसभा निवडणूक २०२४ साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्र्वभूमीवर आयोगाने निवडणूक कालावधीत निवडणूक अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे. महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होणार असून याअनुषंगाने १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्यात १९ एप्रिल रोजी सकाळी सात वाजेपासून १ जून २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत एक्झिट पोल साठी प्रतिबंध लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्यातील मतदान संपण्याच्या आधी ४८ तासाच्या कालावधीत ओपिनियन पोल अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असे निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कल्याण येथे डॉ. भीमराव रामजी आंबेडकर मल्टी स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे उद्घाटन

## बुद्धिस्ट वर्ल्ड युनिव्हर्सिटी आम्ही लवकरच सुरु करणार : डॉ.राजरत्न आंबेडकर

ठाणे/मिलिंद जाधव : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थतज्ज्ञ, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या द प्रॉब्लेम ऑफ द रूपी : इट्स ओरिजिन अॅन्ड इट्स सोल्युशन या ग्रँथाचा आधार घेऊन दिनांक १ एप्रिल १९३५ रोजी रिजर्व बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. त्यानुसार १ एप्रिल ते ३१ मार्च हे भारतीय आर्थिक वर्ष म्हणून गणले जाते.




सर्व बौद्ध समाज बांधवांना संघटित करून बौद्धांची एक स्वतंत्र अर्थव्यवस्था निर्माण होत आहे. भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांच्या विचारातून, दुरदृश्य कार्यप्रणालीतुन बौद्धांच्या स्वतंत्र आर्थिक निर्मितीचा उद्देश ठेवत डॉ. भीमराव रामजी आंबेडकर मल्टी स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी च्या मुख्यालयाचे उद्घाटन कल्याण येथे दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी म्हणजेच भारतीय आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला डॉ. राजरत्न आंबेडकर यांच्या हस्ते संपन्न झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दहा पैकी एक उद्दिष्ट पूर्ण झाल्याने सर्वच ठिकाणाहून आनंद व्यक्त होताना दिसत आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन मुंबई विभाग कमिटी व ठाणे जिल्हा कमिटी यांच्या मार्फत करण्यात आले होते.

बुद्धिस्ट वर्ल्ड युनिव्हर्सिटी आम्ही लवकरच सुरु करणार आहोत. बाबासाहेबांचे विचार पुढे नेण्यासाठी या वुमन रिसर्चला तयार करू. बँकिंग सेक्टर मध्ये आपलं प्रतिनिधित्व असायला हवं, म्हणून डॉ. भीमराव रामजी आंबेडकर मल्टी स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीची पहिली पायरी पूर्ण केली आहे. असे भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय मुख्य संयोजक राहुल शेंडे ठाणे जिल्ह्याचे माजी पोलिस उपायुक्त भरत शेळके, राष्ट्रीय कोषाध्यक्ष शशिकांत जाधव यांच्यासोबतच संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी तसेच भागधारक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय मुख्य संयोजक राहुल शेंडे यांनी मांडले. भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर या उद्घाटन प्रसंगी उपस्थितांना संबोधित केले. तसेच ठाणे जिल्ह्याचे माजी पोलीस उपायुक्त भरत शेळके यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. ही बँक स्थापन होण्यासाठी प्रत्येक दिवस, प्रत्येक महिना, एक एक करत प्रत्येक भागीदार जोडत गेला आणि भारतीय आर्थिक धोरणानुसार एकूण ४००० भागधारक (शेअर होल्डर) जोडत पहिली बौद्धांची बँक निर्माण झाली आहे. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे कोकण प्रदेश (उत्तर) अध्यक्ष रविंद्र गुरचळ, राष्ट्रीय कोषाध्यक्ष शशिकांत जाधव, कोकण प्रदेश मुख्य संघटक व्ही. पी .निरभवणे, ठाणे जिल्हाध्यक्ष बुधाजी वाढविंदे, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष मंगला बिरारे तर आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोकण प्रदेश कमिटी, ठाणे जिल्हा कमिटी, ठाणे जिल्हा महिला कमिटी यांनी मेहनत घेतली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालनाची धुरा योगिता उबाळे यांनी सांभाळली. तर आभार शशिकांत जाधव यांनी केले .

# आ.राम सातपुते यांच्या प्रचारार्थ आ.आवताडे यांच्या विविध ठिकाणी घोंगडी बैठका संपन्न



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी व महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी मंगळवेढा तालुक्यातील विविध ठिकाणी घोंगडी बैठका घेऊन प्रचाराचा शुभारंभ केला आहे. आ आवताडे यांनी मंगळवारी हुलजंती, आसबेवाडी येळगी व सलगर खु. या गावांमध्ये ग्रामस्थांच्या व मतदारांच्या उपस्थितीमध्ये घोंगडी बैठक घेऊन प्रचाराची राळ उठवली आहे.

सदर बैठकांप्रसंगी आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले की, गेल्या १० वर्षाच्या संपूर्ण देशाच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून अनेक लोककेंद्रीत योजनांचा कार्यक्रम राबवला गेला असल्यामुळे सामान्य जनतेच्या जीवनामध्ये परिवर्तन दिसून आले आहे. देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया भक्कम करणारे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाला ताकद देण्यासाठी आपण सर्वांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहून एकजुटीने आणि एक दिलाने त्यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचा निर्धार करणे गरजेचे आहे.

या बैठकांमध्ये त्यांच्यासमवेत श्री संत दामाजी शुगर माजी व्हा चेअरमन अंबादास कुलकर्णी, माजी संचालक विजय माने, माजी उपसभापती शिवाजीराव पटाप, उद्योजक सुधाकर मासाळ, एम. डी. माळी, सरपंच सचिन चव्हाण, अमोल माने, विठ्ठल सरगर, कांबळे सर, भाजपा विधानसभा विस्तारक रमेश मोरे, ग्रा.पं. सदस्य नागेश मासाळ, यल्लाप्पा बंडगर आदी मान्यवर तसेच विविध गावांचे मान्यवर ग्रामस्थ व पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपा पक्षाने सामाजिक आणि राजकीय जीवनात काम करताना कधीही कुणाची जात, पात, धर्म विचारला नाही आणि विचारली जाणार नसल्यामुळे प्रामाणिकपणे काम करणे आणि जनतेचा विश्र्वास संपादित करणे, हेच पक्षाचे लक्ष असते असेही आ आवताडे यांनी सांगितले आहे. त्याचबरोबर पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत पोहोचून पक्षाचे ध्येय धोरणे सामान्य जनतेच्या घरापर्यंत पोहचवल्यास विजयाचा मार्ग आणखी सुकर होईल असे त्यांनी म्हटले आहे.

# मन धागा धागा जोडते नवा मालिकेत पार पडणार आनंदी-सार्थकचा विवाहसोहळा

स्टार प्रवाहवरील मन धागा धागा जोडते नवा मालिकेतल्या सार्थक-आनंदीच्या जोडीला प्रेक्षकांचं भरभरुन प्रेम मिळत आहे. सार्थकचं आनंदीवर जीवापाड प्रेम आहे. आपल्या प्रत्येक कृतीतून आनंदीवरचं प्रेम आणि तिच्याविषयी वाटणारा आदर तो व्यक्त करत असतो. सार्थक सारखा समजून घेणारा आणि चांगल्या-वाईट प्रसंगांमध्ये खंबीरपणे पाठीशी उभा रहाणारा जोडीदार मिळाला तर आयुष्य सुखकर होतं याची अनुभूती ही मालिका पहाताना मिळते. लवकरच संपूर्ण कुटुंबाच्या साक्षीने हे दोघं पुन्हा एकदा लग्नाच्या बेडीत अडकणार आहेत. सार्थक-आनंदीची हळद, मेहंदी, संगीत आणि लग्न हे सगळे विधी अगदी पारंपरिक पद्धतीने पार पडणार आहेत.





आनंदी-सार्थकच्या परिवारासोबतच स्टार प्रवाहच्या कुटुंबातले सदस्यही या विवाहसोहळयासाठी उपस्थित रहाणार आहेत. कला-अद्वैत, जानकी-हृषिकेश, पिंकी-युवराज, नित्या-अधिराज, सायली-अर्जुन या स्टार प्रवाहच्या लोकप्रिय जोड्या आनंदी-सार्थकला शुभेच्छा देण्यासाठी पोहोचणार आहेत. त्यासाठी पाहायला विसरु नका मन धागा धागा जोडते नवा सायंकाळी ६.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# टाटा कोयनेचे पाणी देतो म्हणणाऱ्या भाजपला मतदान करू नका: वॉटर आर्मीचे नेते प्रफुल्ल कदम

**टाटा कोयनेचे तब्बल ११६ पीएमसी समुद्राला वाहून जाणारे स्वच्छ व शुद्ध पाणी हे महाराष्ट्रातील पुणे शिरूर मावळ बारामती सातारा सांगली माढा सोलापूर उस्मानाबाद नगर बीड या सर्व लोकसभा मतदारसंघातील हक्काचे पाणी आहे टाटाच्या सहा धरणातील ४८.९७ टीएमसी पाणी हे थेट उजनी धरणात येणारे पाणी आहे तर या योजनेत ६७.२५ हे टेंभू मशाल उरमोडी टाटापूर आधी सर्व उपसा सिंचन प्रकल्पातून सातारा सांगली सोलापूर**




पंढरपूर/प्रतिनिधीः गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत टाटा वहिनीचे पाणी देतो असे उघडा आश्र्वासन देणाऱ्या भाजपला मतदान करू नका असे आव्हान किसान आर्मीचे वॉटर आर्मीचे ताटात पाणी संघर्ष समितीचे नेते प्रफुल्ल कदम यांनी आज पंढरपूर येथे पत्रकार परिषद केले आहे तसेच त्यांनी मोजणी मायनस होण्याला भाजपचे दोन पालकमंत्री आणि काही आमदार जबाबदार असलेल्या पुढे माहिती देताना ती म्हणाली की ती २७ एप्रिल २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी अकलूजच्या प्रचार सभेत लाखो लोकांच्या समोर प्रथम पंतप्रधानाच्या साक्षीने भाजप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाखा कोणीच पाणी दुष्काळ जनतेला देतो असे दिले होते असे आश्र्वासन त्यांनी ही २७ सप्टेंबर २०१९ रोजी विधानसभा निवडणुकीच्या सभेत दिले होते आज पाच वर्षे झाली तरी त्यांनी यासाठी काही काम केले नाही त्यांनी जर काम केले असते तर पुणे सोलापूर उस्मानाबाद नगर सांगली सातारा बीड या सगळ्या जिल्ह्यातील जनतेला आज त्यांचा काळात पाणी मिळाला असते त्यांनी हा विषय गांभीर्याने घेतला नाही केवळ निवडणुकीच्या खुर्ची त्यांनी आश्र्वासन देऊन जनतेची फसवणूक केली आहे यासाठी आम्ही

या पाण्याची शपथ राहून जनतेला भाजपला उमेदवाराला मतदान करू नका म्हणून उघड प्रचार करणार असलेली किसान आर्मी वॉटर आर्मी नेते आणि टाटा कोयना पाणी संघर्ष समितीचे नेते प्रफुल्ल कदम यांनी जाहीर केले माझ्या सततच्या आंदोलनानंतर आणि माझ्या अभ्यासपूर्ण पाठपुरानंतर राज्य शासनाने दी २ ऑगस्ट २०१८ रोजी हे पाणी आमच्या या माझ्या पुस्तकाच्या आधारे शासन निर्णय पारित केला आहे प्रशासन निर्णय जाणारी भाजप सरकारकडून जनतेला आश्र्वासन देण्यात आले होते तथापि पाच वर्षे होऊन यावर शासनाने काही काम केले नाही किंवा निवडणुकीच्या प्रचारासाठी माझ्या विषयाचा वापर केलेला आहे सदर शासन निर्णय व पूर्ण कदम यांनी विठ्ठलाच्या नामदेव पायरीवर अर्पण केला आहे आज उजनी मायनस होण्याची कारण सुद्धा भाजपचे दोन आमदार याला जबाबदार असलेल्या उघड आरोप कोणी

# आयआयटी, मुंबई येथील परिसंवादात स्वेरीच्या २३ विद्यार्थ्यांचा सहभाग

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केलेल्या व विशेषतः तंत्रशिक्षणात लक्षवेधी कामगिरी करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या गोपाळपूर (ता.पंढरपूर) च्या एकूण २३ विद्यार्थ्यांनी आयआयटी, मुंबई येथील परिसंवादात नुकताच सहभाग घेतला. शैक्षणिक उपक्रमांसोबतच विविध सामाजिक उपक्रम राबवत असताना स्वेरीच्या संशोधन क्षेत्रातील कामगिरीत देखील सातत्य दिसून येत आहे. अशाच उपक्रमांचा एक भाग म्हणून गेल्या महिन्यात आयआयटी, मुंबई येथे झालेल्या 'आकार' या परिसंवाद सत्रामध्ये स्वेरीच्या तब्बल २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपले संशोधनपर लेख सादर केले.




स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता व सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.प्रशांत पवार यांच्या नेतृत्वाखाली डॉ.एम.जी. देशमुख व प्रा.सी.आर. लिमकर यांच्या सहकार्याने सिव्हील इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या हर्षदा सुनील गेळवे, श्र्वेता हणमंत जाधव, मानसी महादेव सलगर, साक्षी सुजीत उबाळे, शुभांगी चंद्रकांत उंबरजे, वैष्णवी धर्मराज जाधव, आकांक्षा ज्ञानेश्र्वर भाकरे, मानसी कांतीलाल कराळे, स्मिता नागेश पंडीत, प्राजक्ता विजय निमकर, तेजश्री सोमनाथ थिटे, प्राची मनोज मोरे, शारदा मोहन डुबल, अक्षता ज्ञानेश्र्वर पाटील, रवि अनिल मस्तूद, रोहीत शहाजी बिचुकले, अनसार पिरसो सुतार, महांतेश शिवानंद दिवटे, संकेत दत्तात्रय शिंदे, श्रुती संजय मंगेडकर या २० विद्यार्थ्यांनी पेपर प्रेझेन्टेशन मध्ये तर साक्षी महादेव कोरके, चैत्राली मिलिंद कुलकर्णी व प्रणाली रमेश जाहीर या तीन विद्यार्थिनींनी पोस्टर प्रेझेन्टेशन मध्ये असे मिळून एकूण २३ विद्यार्थ्यांनी या परिसंवादात सहभाग घेऊन पेपर व पोस्टर यांचे उत्तमरीत्या सादरीकरण केले. आयआयटी, मुंबई मध्ये दि. १६ मार्च २०२३ रोजी झालेल्या या आंतरराष्ट्रीय स्थापत्य अभियांत्रिकी आधारित परिसंवादाचे (इंटरनॅशनल सिव्हील इंजिनिअरिंग सिम्पोझियम) १६ वे सत्र असलेल्या 'आकार' या बुकलेटसाठी विद्यार्थ्यांनी आपले रिसर्च पेपर्स सादर केले. आयआयटी मुंबई येथे झालेल्या या आंतरराष्ट्रीय परिसंवादामध्ये राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतल्यामुळे येथील संशोधनास आणखी गती मिळणार आहे. गेल्या वर्षी देखील स्वेरीच्या १७ विद्यार्थ्यांनी या परिषदेत सहभागी होऊन सादरीकरण केले होते.

एकूणच अशा संशोधनपर परिषदांमुळे तांत्रिक संशोधन करण्याकडे स्वेरीच्या विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याचे दिसून येते. परिषदेमध्ये सहभाग घेतल्यामुळे स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नवी मुंबईत एम.आय.डी.सी तील केमिकल कंपनीत भीषण आग

मुंबईः नवी मुंबईतील एम.आय.डी.सी.त नवभारत केमिकल कंपनीत भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या पाच गाड्या दाखल झाल्या असून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरु आहे. सध्या तरी यात जिवीतहानी झाल्याचे वृत्त नाही नवी मुंबई एम.आय.डी.सी.तील नवभारत इंडस्ट्रियल केमिकल कंपनीत मंगळवारी भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आगीची माहिती मिळताच स्थानिक अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या पाच गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आग



विझवण्याचे काम सुरू होते. ए.एन.आय.च्या प्राथमिक अहवालानुसार, या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तर आगीच्या या घटनेत मालमत्तेचे नुकसान किंवा जीवितहानी याबद्दल अधिक माहिती नाही. व्हायरल होणाऱ्या व्हि.डी.ओ.मध्ये इमारतीतून आगीचे लोट आणि धूर निघताना दिसत आहेत.

# आचारसंहितेचा भंग करणाऱ्या फडणवीस यांना गृहमंत्री पदावरून हटवा

पंढरपूर/प्रतिनिधी:सोलापूर लोकसभेचे माहितीचे उमेदवार राम सातपुते यांची आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तक्रार काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी निवडणूक आयोगाकडे केले आहे भाजप नेते फडणवीस आणि सातपुते यांनी आचारसंहितेचे उल्लंघन केले असल्याचा आरोपी त्यांनी केला आहे.ोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाले आहे मातृ उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या पदाचा गैरवापर करत आदर्श आचारसंहितेचा उल्लंघन केले असून त्याच्यावर गुन्हा दाखल करावा आणि त्यांना गृहमंत्री पदावरून पाठवले जावे अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून



लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आयोजित एका बैठकीत सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार राम सातपुते यांनी गृहमंत्री फडणवीस यांना फोन करून मोठी समाजातील काही व्यक्तींवर कोविड कालावधीतील दाखल करण्यात आलेली गुन्हे मागे घेण्यासाठी विनंती केली यावर गृहमंत्री फडणवीस यांनी गुन्हे मागे घेण्याबाबत आश्र्वासन देण्याचा व्हिडिओ समोर आला आहे त्यामुळे अशा प्रकारे एका समाजाच्या बांधवांना अस्वच्छित करून अशा पद्धतीने प्रलोभन देणे व आश्र्वासन देणे हा आचारसंहितेचा भंग असल्याचा आरोप लोंढे यांनी केला आहे काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी सातपुते यांना व्हायरल व्हिडिओ संदर्भात गृहमंत्री यांना प्रश्र्न विचारले आहेत आजपर्यंत या समाजातील व्यक्तीवरील गुन्हे मागे का घेतले नाहीत निवडणुकीच्या काळात या गुन्ह्याची आठवण कशी झाली असा प्रश्र्नही त्यांनी उपस्थित केला आहे गुन्हे मागे घेण्यासाठी निवडणुकीची वाट पाहत होता काय असे थेट सवाल अतुल लोंढे यांनी फडणवीस यांना विचारला आहे

# जनसामान्यांचा एकच निर्धार पुन्हा एकदा मोदी सरकार: प्रणव परिचारक

## प्रगतशील सोलापूरचे स्वप्न होते साकार जनतेच्या मनात पुन्हा एकदा मोदी सरकार राम सातपुते



पंढरपूर/प्रतिनिधी:सोलापूर लोकसभा मतदारसंघातील ओझेवाडी येथे पंडितराव भोसले यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली या भेटीदरम्यान भोसले कुटुंबाने पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले यावेळी पंडितरावजी भोसले आणि लोकसभा निवडणुकी संदर्भात चर्चा करत विजयासाठी शुभेच्छा दिल्या तसेच आनंद गावाला भेट दिली असता अनवली गावचे सरपंच वल्लभजी घोडके यांनी समस्त गावकऱ्यांच्या वतीने स्वागत करत सत्कार केला यावेळी वडिलांचे घोडके यांनी संपूर्ण आनंद गाव आदरणीय मोदीजींना पुन्हा एकदा पंतप्रधानपद पदी पाहण्यासाठी उत्सुक असून त्यासाठी आम्हा सर्वजण तुमचा सोबत आहेत असा विश्र्वास त्याला यादरम्यान मोदींच्या नेतृत्वाखाली कौतुक करत विदेशात आपल्या भारत देशाचे नाव मोदींमुळे उंचावलेले आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो अशा भावना विविध गावातील ग्रामस्थांनी व्यक्त केल्या तावशी गावाला सदिच्छा भेट दिली या गावचे वैशिष्ट्य म्हणजे तावशी या गावाला माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ गाव व पुरस्कार प्रदान केला असून सर्व ग्रामस्थ मोदींना आपला आदर्श मानतात यावेळी तावशी गावातील गणपतीची व पप्पू यादव यांच्या निवासस्थानी भेट दिली या भेटीदरम्यान गणपतीची यादव यांनी समस्त तावशीकरांच्या वतीने माझे स्वागत करत व लोकसभा विजयासाठी शुभेच्छा दिल्या होत्या अशी गावात अनेक विकास कामे झाली असून त्याचे श्रेय मोदी सरकारची आहे पुन्हा एकदा लाडक्या मोदीजींना पर्यंत पंतप्रधानपदी पाण्यासाठी आम्ही सर्वजमाने काम करू अशा भावना ग्रामस्थांनी यावेळी व्यक्त केले

दरम्यान युवा नेते पणजी परिचारक यांनी देशाचे यशस्वी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचा सशक्त समृद्ध आणि विकसित भारताचा संकल्प साकार करण्यासाठी सोलापुरातून कमळाला मोठ्यांमध्ये मताधिक्याने विजयी करून आणण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे निर्धार केला तसेच आदरणीय मोदीजींना पुन्हा पंतप्रधानपदी पाहण्यासाठी अहवाला तर काम करण्याची याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस शिक्षकांना चव्हाण भाजप प्रभारी अक्षय वाडकर हरिदादा गायकवाड राजश्रीताई भोसले पंढरपूरचे उपसभापती सिताराम भाऊ नागणे सुभाष मस्के सर सुनील काका भोसले संतोष घोडके बबन जाधव किसान मोताडे विनोद गायकवाड गणेश पंडित दीपक पंडित हेमंत दांडगे आनंद वाघ बाळासोपनर हिरालाल लोक सतीश घाडगे दादा घाडगे लक्ष्मण शिंदे अर्जुन कोळी समाधान जाधव राजाभाऊ शिंदे जयसिंग भोजना संतोष भिंगारे राजाभाऊ गायकवाड महादेव शिंदे दिलीप भाऊ गुरव बुवा शिंदे सुदाम मोरे अनिल दांडगे भास्कर मोरे विजय मोरे संजय माळी अजित शिंदे औदुंबर दिसले विजय सरतापे किसान मोर्चा भाजप प्रदेश सदस्य विश्रांती घुसणार शिवदास लाड दत्ता लाड दादा बोटे राजाभाऊ जाधव रंजीत जाधव लक्ष्मण घोडके सर भास्करराव यादव विजय शिवराय पुरुषोत्तम पवार अभिजीत यादव नितीन लाल श्रीनिवास जगदाळे तसेच ग्रामस्थ आणि युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# स्पर्श व युवा संस्कार बहुउद्देशीय संस्था, दहिवली तर्फे विद्यार्थ्यांना आधार

## जेनिथ सिक्युरिटीज अँड इन्व्हेस्टमेंट लि. ह्यांच्या मदतीने मुलांना सक्सेस किटचे वाटप.




ठाणे/मिलिंद जाधवः ठाणे जिल्ह्यातील कल्याण मुरबाड व शहापुरातील मुलांना परिक्षाच्या वेळी आगळी वेगळी मदत युवा संस्कार संस्था ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी गेली २००९ पासुन काम करत आहे ग्रामीण भागातील मुले शिक्षणा पासुन वंचित राहू नयेत म्हणून नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असते ह्या वर्षी ग्रामीण भागातील मुलांकडे परीक्षा आली की. अभ्यासा सोबत परीक्षांसाठी लागणारे साहित्य हे मोठे आव्हान त्यांच्यासमोर समोर असतात त्यात आदिवासी समाज म्हटले तर त्यांच्या कडे ह्या खर्चासाठी प्रश्र्नच असायचा म्हणून स्पर्श संस्था ह्यांच्या माध्यमातून व जेनिथ सिक्युरिटीज अँड इन्व्हेस्टमेंट लि. ह्यांच्या मदतीने मुलांना सक्सेस किट देण्यात आले. असे किट ५५० मुलांना देण्यात आले १०वी., १२वी. व १ली. ते ९वी. पर्यंत मुलांना परिक्षासाठी मदत देण्यात आली दहिवली, वाहोली, आपटी, पोई, चवरे, म्हसकल, म्हसरुंडी, कुंदे, बांगरवाडी, आडिवली, कोणावाडी, बापासई, बेलकरपाडा, हाळ व कोसले आदी गावांत वाटप करण्यात आले.

# भुरीकवठे येथील पाच वर्षाचा रिजान शेख यांनी धरला रोजा

अक्कलकोट/प्रतिनिधीः भुरीकवठे गावातील रहिवाशी असलेल्या श्री चीनुमिया मौला शेख यांचे नातू रिजान खुतबोद्दीन शेख रा. सोलापूर वय ५ वर्ष ५ महिने ङ्घत्रः मध्ये शिकणाऱ्या बालकाने आपली आई सौ. सिरीन व वडील खुतबोद्दीन यांच्याकडे सध्या सुरू असलेल्या रमजानच्या पवित्र रोजेविषयी दररोज काय खायचं अन् काय खायचं नाही याविषयी दररोज विचारपूस करत असे त्यावेळी त्याचे आई वडील त्याला सांगत होते की बेटा लहान मुले रोजा करत नसतात. तू मोठा झाला की रोजा कर असं सांगताच तो नाही नाही मला सुध्दा रोजा ठेवायचं आहे असं बोलत होता दररोज पहाटे तो आपल्या आई वडीलासोबत सहेरी साठी उठत होता.पण तो अजून लहान आहे ऊन खूप आहे म्हणून त्याला रागावून झोपी घालत होते.पण आजच्या २१ व्या रोजे दिवशी त्याने आई वडील उठण्या अगोदर स्वतः उठून ब्रश करून फ्रेश होऊन तयार झाला आणि मला सुध्दा आज रोजा करायचं आहे अशी जिद्द करताच वडिलासोबत सहेरी केला व झोपी गेला. सकाळी शाळेला जायची वेळ होत असताना आईने जेवण्यासाठी आग्रह केला तर नाही मी रोजा आहे मी पाणी सुध्दा पिणार नाही पाणी पिलो तर देव माझी जीभ कापतो असं म्हणत ९ वाजता शाळेला गेला जात असताना आईने बॅगेत पाणी बॉटल डबा बांधून दिला बेटा भूक लागली की जेवण कर पाणी पी म्हणून शाळेला पाठवून दिला.१२ वाजण्याच्या सुमारास शाळेत मॅडमला फोन करून विचारलं तर रिजान आज रोजा केलाय म्हणे तो जेवण कर बोलल्यावर जेवला नाही. अन् पाणी सुध्दा पिला नाही. असं बोलतच आश्र्चर्य वाटलं .१ वाजता घरी आल्यावर जेवण का नाही केला भूक लागली नाही का जेवण कर बोलल्यावर नाही मी रोजा आहे जेवण करत नसतात बोलला.अन् फ्रेश होऊन झोपी गेला ४ वा उठला उठल्यावर बेटा जेवण कर नाही मी नाही करत बोलला बेटा तू लहान आहेस का रोजा केला बोलताच त्याच्या तोंडून आवाज आला मला कलेक्टर व्हायचं आहे!!!म्हणून मी रोजा केलाय असा बोलला अरे वा! चांगली गोष्ट आहे म्हणत त्याला बाजारात घेऊन जाऊन नवीन कपडे खायाला आणायला म्हणून घेऊन गेलो व संध्याकाळी ६.वाजता घरी आले अन् संध्याकाळी बाळे येथील मस्जिद मध्ये जाऊन जमात सोबत रोजा इफ्तार केला.या बालकांचे आणखीन एक विशेष म्हणजे रमजानच्या पवित्र महिन्यातील तराबेची एक ही नमाज त्याने सोडलेली नाही.अश्या या कडाक्याच्या उन्हात लहान बालकाने रोजा पूर्ण करावा ही खूप मोठी गोष्ट आहे.. रिजान चा हा त्याच्या आयुष्यातील पहिला रोजा ठरला. व तो त्याने पूर्ण केला याबद्दल त्याचे सर्व पाहुणे व मित्र मंडळीमध्ये कौतुक होत आहे..



# दुधनी जि.प.शाळेत पोमू राठोड यांच्या पतसंस्थेत बिन विरोध निवड झाल्याने सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमन पदी श्री पोमू राठोड यांच्या निवड झाल्याने दुधनी जिल्हा परिषद केंद्र शाळेत केंद्र प्रमुख सुरेश शटगार व रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आली आहे.

दुधनी येथील जि प प्रा केंद्र शाळेच्या कन्नड मुले,उर्दु शाळा,मराठी व कन्नड मुली असे चारही शाळेच्या वतिने भव्य दिव्य असे सत्कार समारंभ आयोजित केली होती.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी काजीकणमस व दुधनी केंद्राचे केंद्र प्रमुख श्री सुरेश शटगार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष तथा मराठी केंद्र शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षणतज्ञ सैदप्पा झळकी व ज्येष्ठ समाज सेवक बाबा टक्कळकी हे उपस्थित होते.

याप्रसंगी केंद्रप्रमुख सुरेश शटगार,रिपाइंचे सैदप्पा झळकी,मराठी शाळेचे मुख्याध्यापक श्रीसैल मलगाण,कन्नड शाळेचे महांतेश कर सर,उर्दु शाळेचे श्री सिध्दाराम चौधरी यांचे पोमु राठोड यांच्या अभिनंदन पर समयोचित भाषणे झाली.यासत्कार सोहळ्यात सुरेश शटगार, सैदप्पा झळकी, केंद्रीय मुख्यापक श्री श्रीसैल मलगाण, शिवचलप्पा बाबासर, शिध्दाराम चौधरी,संतोष जोगदे,श्री उड्डा सर,कोरबु सर,स्वामीनाथ महामुनी,भिमनगर शाळेचे मुख्याध्यापक श्री मल्लीनाथ कांबळे,श्रीसैल धोडमनी,फय्याज सुतार, अंधारात उजनी,बाबा टक्कळकी,महांतेश कर,रविकुमार कोरचगाव,सिध्दाराम गोरे,सुभाष अतनूर,गुरय्या सलगर,सिध्दु राठोड, महिबूबसो बागवान,भारत रठोड,बसवराज मंत्री,तसेच सर्व सह शिक्षकी आवर्जून उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचलन सहशिक्षक श्री संतोष जोगदे यांनी तर आभार कर सर यांनी केली आहे.

पतसंस्था स्थापनेपासून आजपर्यंत दुधनी भागातील तील कोणत्याही शिक्षकाला संचालक पद किंवा व्हाईस चेअरमन पदी मिळाले नव्हते प्रथमच पोमू राठोड यांना हा पद मिळाल्यांने या परिसरातील शिक्षक वर्गात व सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाली आहे.

# धरित्री विघालयात विघार्थी बिनखर्चात साहित्य निर्मिती कार्यशाळा संपन्न





नळदुर्ग/प्रतिनिधीः ज्ञानदीप कलोपासक मंडळ, . संचलित धरित्री विद्यालय आलियाबाद येथे घेण्यात आली.या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना कृतीतून शिक्षण या माध्यमातून शाळेचे मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र राज्यआदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यानुभव विषयातील समाजासाठी मौल्यवान वस्तु नारळाच्या करवंटीपासून फुलदाणी बनवणे ,खोक्यापासून शिल्प तयार करणे ,पत्रावणी व द्रोण तयार करणे,पंखा तयार करणे ,मातीपासून प्राणी पक्षी तयार करणे ,बाहूली तयार करणे ,रांगोळीचे साचे तयार करणे ,आगपेटीपासून गाडया सोफा तयार करणे ,आईस्क्रीम चमचे वापरुन खुर्ची तयार करणे ,सुतळीपासून वॉलपीस ,एकलिटर पाण्याच्या बाटल्यापासून कुंडया,उडया मारणारा बेडूक तयार केले,शीतपेयांच्या झाकणापासून तोरणे , उत्पादक याविषयी माहिती सांगितली तसेच यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्र्वास,आपलेपणा, जबाबदारी,कार्यक्षमता, प्रामाणिकपणा, शिस्त व कर्तव्यासाठी समर्पण करणे यासारख्या चांगल्या गोष्टी विकसित होतात असे याप्रसंगी मार्गदर्शन केले. तसेच विषय शिक्षक श्री. चव्हाण रमेश यांनी कार्यानुभव विषयाचे महत्व व त्याचे व्यवस्थापन खरेदी, टाकाऊपासून टिकाऊपणा कार्यक्षमपणा, सखोल माहिती दिली त्यानंतर विद्यार्थ्यांकडून कृती अनुभव घेण्यात आला. विद्यार्थ्यांकडून टाकाऊपासून टिकाऊ झुंबर, प्रतिकृती, फुलदाणी,टोपली, चटई, तसेच पानापासून पत्रावळी द्रोण कागदापासून पक्षी,प्राणी, फुले, कागदी तोरण, माती पासून प्राणी, पक्षी, फळे,फळभाज्या, विविध आकाराच्या वस्तू या कार्यशाळेत करून घेण्यात आले. सदरील कार्यशाळेस स्वतः विद्यार्थ्यांनी वस्तू निर्मितीसाठी सर्व साहित्य घेऊन आले होते. इयत्ता पाचवी ते नववीतील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने व आनंदाने सहभागी झाले होते. ही कार्यशाळा पार पाडण्यासाठी कार्यानुभव शिक्षक श्री चव्हाण रमेश श्री.सातलगावकर अण्णाप्पा व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ही कार्यशाळा संपन्न झाल्यानंतर संस्थेचे अध्यक्ष, .बाबुराव (भाऊ) चव्हाण संस्थेचे, सचिव सयाजी शिंदे, कोषाध्यक्ष मल्लिनाथ माळगे ,सहसचिव वसंतराव रामदासी ,सदस्य किरण पाटील ,शालेय व्यवस्थापन अध्यक्षा नीताताई पाटील सर्व पदाधिकारी व पालक वर्गातून समाधान व्यक्त केले.